नियमित दिवाणी दावा नं. २२२/२०१५
शोभाबाई + १ वि. गजानन व ईतर
**निशाणी क्र.६३ खाली**
C.N.R No. MHWS020006302015

**<u>वादीचा उलटतपास प्रतिवादी कमांक १ चे अधिवक्ता श्री. पी. बी. बागडीया यांचे मार्फत फेरशपथेवर सुरु.</u>**

माझे शिक्षण चौथी पर्यंत झाले आहे. मला सर्वे नंबर आणि गट नंबर मधला फरक माहित नाही. देवराव आणि गजानन यांनी दाखल केलेले कागदपत्रे मी पाहिलेले नाही. मी माझे वकिलांना आजपर्यंत कधीही देवराव आणि गजानन यांनी कोणती कागदपत्रे दाखल केली याबाबत विचारणा केली नाही. देवराव आणि गजानन यांनी केलेल्या खरेदीपत्राबाबत मी रजीष्टर ऑफीसला जावून चौकशी केली. मी रजीष्टर ऑफीसमध्ये जावून अशी चौकशी केली की, माझ्या वडिलांना कळत नसतांना तुम्ही खरेदीखत कशी नोंदविली. त्यांनी मला काय उत्तर दिले हे मला लक्षात नाही. या गोष्टीला ०७ (सात) वर्षे झाली. बबन तुपे आणि विश्वास नानवटे हे खरेदी खतावरचे साक्षीदार आहेत. बबन तुपे आणि विश्वास नानवटे यांच्याकडे मी चौकशी केली असता त्यांनी काय उत्तर दिले हे मला लक्षात नाही. खरेदी कार्यालयाला मी नोटीस दिली होती. त्यांनी काय उत्तर दिले हे मला लक्षात नाही. देवराव आणि गजानन यांनी केलेले खरेदीपत्र रद्द करण्याचा मी प्रयत्न केला. खरेदी रद्द करण्याचे कारवाईबाबत माझ्याकडे कागदपत्रे नाहीत. माझे वडिलांनी गजाननला करून दिलेले खरेदीपत्रच मला रद्द करायच आहे.

माझे वडिलांकडे २० (वीस) एकर जमीन असल्याबाबत मी कागदपत्रे पाहिलेले नाही. दावा मिळकत ही मुळ कृष्णाजी यांच्या मालकिची होती असा दाखविणारा कागदपत्र माझ्याकडे नाही. दावा मिळकत कृष्णाजीकडे कशी आली याबाबतचे कागदपत्रे देखील माझ्याकडे नाहीत. दावा मिळकत ही कृष्णाजीची मिळकत असल्याबाबत मला माहिती आहे कारण ती माझ्या आजोबांची मिळकत आहे. माझे वडिलांची आणि काकांची झालेल्या खरेदीपत्राच्या वेळी मी हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिलांची आणि काकांची खरेदीची मिळकत कशी आली, कुणाची होती याबाबत मला माहिती नाही. आत्याने हक्क सोडल्याची लिखापडी झाली किंवा कसे हे मला माहित नाही. गजानन आणि देवराव यांनी

खरेदी घेतलेल्या मिळकतीच्यावेळी मी हजर नव्हते आणि मला माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, गजानन आणि देवराव यांनी ती खरेदी घेतलेली जमीन सोडून घेतली होती.

दाव्यातील जमिनीचे मी ७/१२ उतारा पाहिलेला आहे. गजानन आणि देवरावच्या नावाने ७/१२ उतारा आहे. शकुंतला आणि रेखा यांचा दावा जमिनीशी काहीही संबंध नाही. गट नंबर ३८ मध्ये शकुंतला आणि रेखा यांच्या नावे ४० आर. जमीन प्रत्येकी नोंदल्याबाबत मला माहिती आहे. माझे वडिलांनी शकुंतला आणि रेखा यांना करून दिलेले खरेदीपत्र मला मान्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, शकुंतला आणि रेखा तसेच गजानन आणि देवराव यांच्या खरेद्या एकाच वर्षोतील आहेत. शकुंतला आणि रेखा तसेच गजानन आणि देवराव यांच्या खरेदी खतामध्ये किती दिवसाचे अंतर आहे हे मला सांगता येत नाही. शकुंतला आणि रेखा यांना खरेदी खत करून देतांना माझे वडिलांची तब्येत चांगली होती आणि त्यांनी स्वतःहून ते खरेदी करून दिल्या. साक्षीदार स्वतःहून सांगते की, त्यावेळी ते दारू पीत होते. माझे वडिलांची तब्येत नऊ ते दहा वर्षापूर्वी बिघडली. माझे वडिलांची तब्येत बरी नसतांना मी कधीही त्यांना दवाखान्यात घेवून गेलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल आजारी असतांना माझे वडिलांचा सांभाळ देवराव आणि गजानन यांनी केला. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईचे मृत्युनंतर माझे वडिलांचा सांभाळ, त्यांच खाण पीण आणि औषधोपचार हे देवराव आणि गजानन करत होते.

गट नंबर १७ हे माझे वडिलांकडे कसे आले आणि त्याचा जुना रेकॉर्ड, ९/३ ९/४ चा उतारा मी पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ३८ सर्वे नंबर ८/२ हे माझे वडिलांनी आणि काका नामदेव यांनी खरेदी घेतले. गट नंबर ३८ हे माझे आजोबांचे मालकिचे असल्याबाबत माझ्याकडे कागदपत्रे आहेत. दर्याजी तुकाराम व चतुराबाई रामचंद्र यांचे नाव मी ऐकलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिलांनी आणि काकांनी गट नंबर ३८ हे दर्याजी तुकाराम व चतुराबाई रामचंद्र यांचेकडून विकत घेतलेले आहे. गट नंबर ३८ हे माझे आजोबांचे असल्याबाबत माझ्याकडे कागदपत्रे नाहीत. माझे वडिलांनी गजानन आणि

देवराव यांना करून दिलेले खरेदी खत मी माझे वडिल मयत झाल्यानंतर तहसिलला येवून पाहिले. माझे वडिलांनी माझे भावांना करून दिलेले खरेदी पत्र मला दाखविले तर मी ते ओळखु शकेल. साक्षीदारास निशाणी क्रमांक ४२ लगत अनुक्रमांक नंबर १ ला दाखल असलेल्या दिनांक ०८/०७/२०१३ रोजीचे खरेदी पत्र साक्षीदारास दाखविण्यात आले. सदरच्या खरेदीपत्रावरील फोटो साक्षीदाराने तिच्या वडिलांचा असल्याबाबत ओळखले. तसेच साक्षीदारास निशाणी क्रमांक ४२ लगत अनुक्रमांक नंबर २ ला दाखल असलेल्या दिनांक ०८/०७/२०१३ रोजीचे खरेदी पत्र साक्षीदारास दाखविण्यात आले. सदरच्या खरेदीपत्रावरील फोटो साक्षीदाराने तिच्या वडिलांचा असल्याबाबत ओळखले. खरेदी पत्रावरील सही माझे वडिलांची आहे किंवा नाही यासाठी मी त्यांच्या सह्या ओळखण्यासाठी/तपासण्यासाठी मी अर्ज केले किंवा कसे हे मला आठवत नाही. नऊ ते दहा वर्षापूर्वी माझे वडिल सही करत होते आणि त्यावेळी मी त्यांना पाहिले. साक्षीदार स्वत:हून सांगते की, मी माझे वडिलांना पंधरा वर्षापूर्वी सही करतांना पाहिले. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ प्रमाणे ज्यांच्या त्यांच्या ताब्यात शेती आहे.

प्रश्न — तुमचे वडिल आजारी असल्याबाबत कागदपत्रे कुणाकडे आहे ?
उत्तर — माझे वडिल मयत झाल्यानंतर कागदपत्रे सांभाळून ठेवलेले नाहीत.

केस दाखल करतांना मी आणि शोभा दोघेही आले होते. आमच्या वकिलांना माहिती ही शोभा हिने दिली होती. साक्षीदार पुन्हा सांगते की, आम्ही दोघींनी माहिती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, देवरावच्या सांगण्यावरून हे खोटे प्रकरण मी पुढे सरकविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ३८ आणि गट नंबर १७ माझे वडिलांचे स्वकष्टार्जीत जमीनी होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रकरणाची काहीही माहिती नसतांना देवरावच्या सांगण्यावरून मी प्रस्तुतचे प्रकरण दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणातील सर्व कामकाज हा देवरावच माझ्यावतीने पाहात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी देवरावच्या सांगण्यावरून खोटा पुरावा दिलेला आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**प्रतिवादी क्रमांक ३ व ४ व त्यांच्या वकिलांना पुकारले असता गैरहजर. मुदतीसाठी कोणताही अर्ज नाही. सबब साक्षीदाराचा प्रतिवादी क्रमांक ३ व ४ च्या वतीने उलटतपास नाही.**

**प्रतिवादी क्रमांक ५ ते ७ व त्यांच्या वकिलांना पुकारले असता गैरहजर. मुदतीसाठी कोणताही अर्ज नाही. सबब साक्षीदाराचा प्रतिवादी क्रमांक ५ ते ७ च्या वतीने उलटतपास नाही.**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by NAYOMI PRAKASH PAWAR
Date: 2022.11.22 17:14:49 +0530

(नयोमी. पी. पवार)

दिनांक — २२.११.२०२२

सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर),
वाशिम.

नियमित दिवाणी दावा नं. २२२/२०१५
शोभाबाई वि. गजानन व ईतर
**निशाणी क्र.६३ खाली**
C.N.R No. MHWS020006302015

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file are same word to word, as per the original Evidence.

| | |
|---|---|
| Court Name | : Jt. Civil Judge (S.D.), Washim, Dist.Washim. |
| Date | : 22.11.2022. |
| Evidence signed by the presiding officer on | : 22.11.2022. |
| Evidence uploaded on | : 22.11.2022. |
| Evidence uploaded by | : S. P. Kale (Stenographer G-III ) |